
अस्सल सोलापुरी

# सुराज्य
## सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

शनिवार, दि. २० ऑगस्ट २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३२१ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८



## कॉमेंट्रीमध्येही भारत-पाकिस्तान सामना

**नवी दिल्ली :** आशिया कप २०२२ स्पर्धेला २७ ऑगस्टपासून सुरुवात होणार असून स्पर्धेच्या दुसऱ्याच बहुप्रतिक्षित भारत विरुद्ध पाकिस्तान सामना खेळवला जाणार आहे. यंदाच्या आशिया कपमध्ये कॉमेन्ट्री बॉक्समध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान असा सामना रंगणार आहे. कारण यंदा कॉमेन्ट्री करण्यासाठी भारताचे माजी कोच रवी शास्त्री, माजी खेळाडू गौतम गंभीर तसंच पाकिस्तानचे माजी खेळाडू वसीम अकरम, वकार युनुस यासारखे दिग्गज असणार आहेत. त्यामुळे कॉमेन्ट्री बॉक्समध्येही चुरस पाहायला मिळणार हे नक्की.





# कोणाला किती वेळ किती वेळा ?

# नाराज आमदारांच्या गुप्त बैठकांवर गुप्तचर यंत्रणांचा गुप्त वॉच

सुराज्य/सोलापूर

**महाविकास आघाडी सरकारमध्ये शिवसेनेतील आमदारांमध्ये नाराजी होती. नाराज आमदारांच्या गुप्त बैठका होत होत्या. त्यातूनच बंड निर्माण झाले. शिवसेनेचे बंडखोर आमदार सुरतला पोहचेपर्यंत सरकारला खबरसुध्दा नव्हती. परिणामी सरकार कोसळले. आता 'ई-डी' सरकार अस्तित्वात आले असले तरी पहिल्या मंत्रिमंडळ विस्तारानंतर बंडखोर आमदारांमध्ये पुन्हा एकदा नाराजी निर्माण झाली आहे. त्यातूनच नाराज आमदारांच्या पुन्हा एकदा गुप्त बैठका सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पुन्हा पहिला पाढा नको म्हणून कोणता नाराज आमदार? कोणाला भेटतो? किती वेळा आणि किती वेळ भेटतो? या सर्व गुप्त हालचालींवर आता राज्य सरकारने गुप्तचर यंत्रणेमार्फत गुप्तपणे वॉच ठेवला जात असल्याचे पुढे आले आहे.**

नाराजीतून अस्तित्वात आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ई-डी) सरकारमध्ये मंत्रिमंडळाच्या पहिल्या विस्तारात मंत्रिपद न मिळाल्याने शिवसेनेचे बंडखोर आमदार नाराज झाले आहेत. काही आमदारांनी त्यांची नाराजी उघडपणे बोलून दाखवली असून काहींनी मात्र मौन बाळगणे पसंत केले आहे. त्यांच्याकडून दगाफटका होऊ नये म्हणून सरकारकडूनच आता विशेष काळजी घेतली जात आहे. त्यासाठी राज्याची गुप्तचर यंत्रणा कामाला लावली असून नाराज आमदारांच्या गुप्त बैठकांवर ही गुप्तचर यंत्रणा गुप्तपणे वॉच ठेवत आहे. त्यामुळे नाराज आमदारही आता सावध झाले आहेत.



### नाराजी उघड, समजूत काढणे अवघड

महाविकास आघाडी सरकारमधील अब्दुल सत्तार आणि संजय राठोड यांनी आक्रमक पवित्रा घेऊन मंत्रिपद पदरात पाडून घेतले. त्याचवेळी मंत्रिपदाचे दावेदार असणारे आ. संजय शिरसाट, भरत गोगावले यांना ऐनवेळी डावलण्यात आले. त्यामुळे त्यांनी उघड नाराजी व्यक्त केली आहे. दुसरीकडे मंत्रिपद हा माझा हक्कच असल्याचे आ. बच्चू कडू यांनी जाहीर केल्यामुळे बंडखोर आमदारांमधील नाराजी उघड झाली आहे. त्यांची समजूत घालणे आणि नाराजी दूर करणे आता अवघड झाले आहे.

### दिवस-रात्र पाळत

मंत्रिमंडळ विस्तारानंतर नाराज आमदारांच्या हालचालींना वेग आला आहे. त्यांनी वेगळा विचार करू नये म्हणून सरकारने गुप्तचर यंत्रणेमार्फत त्यांच्यावर दिवस-रात्र पाळत ठेवली आहे. नाराज आमदार कुठे जातात? कोणाला भेटतात? कितीवेळ आणि किती वेळा भेटतात? त्यांच्या गुप्त बैठका कोठे होतात? , याची नोंदी ठेवल्या जात आहेत. या आमदारांच्या बैठका कुठे होत आहेत, हेही पाहिले जात आहे, अशी माहिती पुढे आली आहे.

### ज्याच्यासाठी केला होता अट्टाहास...

शिवसेनेवरील नाराजीतून एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी शिवसेनेविरूध्द बंड केले होते. बंडानंतर अस्तित्वात आलेल्या सरकारमध्ये आपलेही अस्तित्व असले पाहिजे, ही त्या बंडखोर आमदारांची इच्छा होती. पण शिंदे गटाच्या फक्त ९ आमदारांनाच मंत्रिमंडळाच्या पहिल्या विस्तारात स्थान मिळाले आहे. त्यामुळे उर्वरित ३१ मधील बहुसंख्य आमदारांमध्ये नाराजी पसरली आहे. ज्याच्यासाठी अट्टाहास केला होता; तेच साध्य होत नसल्यामुळे नाराज आमदारांच्या नाराजीमध्ये भर पडली आहे.

### उपचारापेक्षा प्रतिबंध बरा

नाराजांची नाराजी दिवसागणिक वाढत आहे. पुढील मंत्रिमंडळ विस्तारापर्यंत त्यात आणखी भर पडू शकते. त्यातून काही दगाफटका झाल्यानंतर सावरासावरी करण्यापेक्षा आताच आवराआवरी करणे फायद्याचे ठरणार असल्याने शिंदे-फडणवीस यांनी नाराजांवरच वॉच ठेवण्याचा आणि त्यासाठी राज्याच्या गुप्तचर यंत्रणेचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नाराजांनी एखादे वेगळे पाऊल उचलण्याआधीच त्यावर निर्णय घेणे सोपे होणार असल्याचे बोलले जात आहे.



## लेझीम, बँजोच्या तालात गोविंदा पथकांनी फोडली दहिहंडी

सुराज्य/सोलापूर

गोविंदा आला रे आलाचा जयघोष, दहीहंडीच्या ठिकाणी तिरंगा ध्वजाची सजावट, ढोल, ताशा, बँजो आदी पारंपारिक वाद्यांच्या तालावर लेझिम ताफ्यासह शहरात विविध ठिकाणी गोविंदा पथकांनी दहीहंडी फोडली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेली दोन वर्षे गोकुळाष्टमी साजरी करता आली नाही. मात्र यंदाच्या वर्षी गोविंदा पथकांनी जल्लोषात गोकुळाष्टमी साजरी केली. ऐतिहासिक परंपरा असलेल्या बाळीवेस येथे दयावान ग्रुपतर्फे ४०फुटी दहीहंडी, मंगळवार बाजार येथेही ४० फूट दहीहंडी फोडण्यात आली. याबरोबरच मोदी, दमाणी नगर, खड्डा तालीम, बेडर पूल, चौपाड आदी ठिकाणी १० ते ३० फूटापर्यंतची दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. अनेक ठिकाणी विजेत्या गोविंदा पथकांचा रोख बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. खड्डा तालीम व परिसरात खड्डा तालीम गोविंद पथकानेही मोठ्या जल्लोषात लेझिम डाव खेळत गोविंदा आला रे आला च्या जयघोषात ढोल ताशा बँजोच्या निनादात ५ ठिकाणी तीन ते चार थराचे मानवी मनोरे लावत दहीहंडी फोडली. यावेळी माजी नगरसेवक सुनील कामाठी यांनी पाचवी दहीहंडी फोडून जल्लो केला. यावेळी रंगनाथ पवार, अण्णा विटकर, शिवाजी विटकर, मारुती विटकर, नागनाथ घोडके, अनिल कामाठी, मल्लिनाथ पाटील, मनोहर चौगुले, बापू धोत्रे, पोपट भोसले, नागनाथ चौगुले, गणेश मिनगुले, चन्नवीर बिराजदार, वैभव परदेशी, महेश खानोरे, संतोष अलदी, संतोष जेडगे, चंदू कोळी, बाळू पांढरे, प्रकाश मनसावाले, अर्जुन तुक्कुवाले आदींसह मोठ्या संख्येने खड्डा तालीम परिसरातील ज्येष्ठ मंडळी उपस्थिती होते. येथे दहीहंडी फोडल्यानंतर हुग्गीचा (खीर) प्रसाद वाटप करण्यात आला. या प्रसादाचा आस्वाद गोविंदा पथकांसह श्रीकृष्ण भक्तांनी व नागरिकांनी घेतला.

## श्रीकांत देशमुखांना २३ ऑगस्टपर्यंत अटक न करण्याचे आदेश

सुराज्य/सोलापूर

महिलेवर दुष्कर्म केल्याप्रकरणी श्रीकांत देशमुख यांनी केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जाची सुनावणी सोलापूरचे जिल्हा व सत्र न्यायाधीश के.डी.शिरभाते यांच्यासमोर झाली असता, अर्जदाराचे वकील ॲड. मिलिंद थोबडे यांनी आपले युक्तिवादात फिर्याद ही उशिराने दाखल केलेली आहे. तसेच फिर्यादीचे अवलोकन केले असता, दुष्कर्माचा गुन्हा सकृत दर्शनी दिसून येत नसल्याचा युक्तिवाद मांडला. तसेच उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे सादर केले. अर्जदाराने आजपर्यंत तपास कामात पोलिसांना सहकार्य केले आहे. त्यामुळे अर्जदाराचा अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात यावा असा युक्तिवाद मांडला.

तर सरकार पक्षातर्फे ॲड. प्रदीपसिंह राजपूत यांनी आपले युक्तिवादात सकृत दर्शनी आरोपींने दुष्कर्माचा गुन्हा केल्याचे दिसून येत असल्याने आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात यावा असा युक्तिवाद मांडला. त्यावर पुढील सुनावणीस दि.२३ ऑगस्टला देण्यात अली आहे.तर न्यायालयाने श्रीकांत देशमुख यांस दि.२३ ऑगस्टपर्यंत अटक न करण्याचा आदेश वाढवून दिला. यात आरोपीतर्फे ॲड.मिलिंद थोबडे, ॲड. आशिष गायकवाड, मुंबई ॲड.बाबासाहेब जाधव ॲड. विनोद सूर्यवंशी, ॲड.अभिजित इटकर, ॲड.निशांत लोंढे यांनी तर सरकारतर्फे ॲड.प्रदीपसिंह रजपूत यांनी तर मूळ फिर्यादीतर्फे ॲड. विद्यावंत पांढरे यांनी काम पाहिले.

## देशभरात ३१ ठिकाणी सीबीआयची छापेमारी

**दिल्ली :** दिल्ली सरकारचं नवीन नवं मद्य धोरण चांगलेच अडचणीत आल्याचं पाहायला मिळत आहे. शुक्रवारी सकाळी सीबीआयने दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांच्या घरी छापा मारला होता. त्यानंतर सुद्धा सीबीआयने देशभरात ३१ ठिकाणी छापेमारी केली आहे. यामध्ये त्यांना अनेक पुरावे मिळाले आहेत.

## ३६ सधन कार्डधारकांनी सोडले धान्य

### सोलापूर शहरातील योजनेचा मंत्रालयात वाजला डंका

सुराज्य/सोलापूर

सधन परिवारांनी धान्य सोडा या सोलापूर पुरवठा विभागाच्या योजनेला शहरात चांगला प्रतिसाद मिळत आहे. शुक्रवारी पुरवठा विभागाचे उपायुक्त यांच्या उपस्थित शहरातील ३६ कार्डधारकांनी आपले रेशन कार्ड जमा करत धान्य सोडले आहे.

धान्य सोडा ही योजना फक्त राज्यात सोलापूर पुरवठा विभाग राबवत असल्याने या कामांची दखल मंत्रालय प्रधान सचिव विजय वाघमारे यांनी घेतली आहे. शहरातील धान्य सोडा या योजनेचा डंका आता मंत्रालयात वाजला आहे.



पुरवठा विभागाचे उपायुक्त डॉ.त्रिगुण कुलकर्णी यांनी अन्न धान्य योजनेतून बाहेर पडा ह्याबाबत आवाहन केले होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षा लांडगे, अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी विवेक साळुंखे, परिमंडळ अधिकारी संजय निरगुणकर, नितीन वाघ, अनिल गवळी, सुरेश गायकवाड, अनिल शहापुरे, राजेश यमपुरे, सुयोग देशमुख, लक्ष्मण पवार, निठुरे, अंकुशे आदींसह जिल्ह्यातील पदाधिकारी तसेच जिल्हा संपर्कप्रमुख नितीन पेंटर उपस्थित होते.

### पुरवठा विभागाचा साद... नागरिकांचा प्रतिसाद

हिप्परगा गावचे उपसरपंच सचिन भिगारे सेवानिवृत, शिक्षक विश्वभंर दरेकर, नागेश मग्रुमखाने, अनिल जमदाडे यांचा समावेश आहे. अन्नधान्य अनुदानातून बाहेर पडा ही योजना फक्त सोलापूर जिल्हापुरवठा विभागाच्या वर्षा लांडगे प्रभावीपणे राबवत आहेत. या योजनेल चांगला प्रतिसाद मिळत असल्याने या मोहिमेचा डंका मंत्र्यालायात वाजला आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तुमच्या भूतकाळावर तुमचे 'भविष्य' अवलंबून आहे!

| कल्याण |
|---|
| -------- |

| मेन बाजार |
|---|
| -------- |

## दुहेरी पाइपलाईन कामाचा टेंडर घोटाळा पोहचला किरीट सोमय्यांपर्यंत

### संबंधित अधिकारी आणि नेत्यावर गंडांतर येणार?

सुराज्य/सोलापूर

**उजनी दुहेरी जलवाहिनीचे टेंडर डीएनएस कंपनी ऐवजी लक्ष्मी कंपनीला देऊन १०० कोटींचा मलिदा लाटण्याचा प्रकार स्मार्टसिटीच्या अधिकाऱ्यांकडून सुरू असल्याची तक्रार भीमसैनिक सामाजिक संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शांतीकुमार नागटिळक यांनी केली, याची दखल भाजपाचे माजी खा.किरीट सोमय्या यांनी घेतली आहे. या प्रकरणाच्या कागदपत्रांची तपासणी करून लवकरच भूमिका घेणार असल्याची माहिती नागटिळक यांनी दिली. सोमय्या यांच्या तक्रारीनंतर बड्या बड्या नेत्यांवर कारवाई झाल्याचे उदाहरण ताजे असताना सोलापूरचे प्रकरण त्यांच्याकडे पोहचल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहेत.**

अधिकारी आणि कंत्राटदारांच्या संगनमताने लक्ष्मी कंपनीकडून अधिकचे पैसे घेऊन दुहेरी पाईपलाईन कामाचे टेंडर देण्याचा मोठा घाट सुरू असल्याचा आरोप नागटिळक यांनी केला आहे. याची चर्चा गेल्या दोन दिवसांपासून महापालिकेत सुरू आहे. दरम्यान, नागटिळक यांनी या प्रकारची तक्रार मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे केली आहे. भाजपाचे माजी खा. किरीट सोमय्या यांनी नागटिळक यांना फोन करून संपूर्ण प्रकरणाची माहिती घेतली आणि टेंडरची नेमकी कशी प्रक्रिया सुरू आहे, याची पडताळणी करून लक्ष घालण्याचे आश्वासन दिल्याचे नागटिळक यांनी सांगितले.



पालिकेच्यावतीने स्मार्टसिटी अंतर्गत सोलापूर ते उजनी ही दुहेरी दुहेरी पाइपलाईन टाकण्यात येणार आहे. त्याचे टेंडर जवळपास ६४० कोटींचे आहे. या टेंडरची प्रक्रिया सुरू आहे. हैदराबादची कंपनी डीएनसीला अधिकृत टेंडर मंजूर होऊ नये म्हणून या कामामध्ये त्या कंपनीला बाजूला करण्याचा प्रयत्न होत आहे. डीएनसी कंपनी हे काम ५४० कोटीमध्ये पूर्ण करणार आहे. या कामांमध्ये डीएनसी कंपनी शासनाचे १०० कोटी रुपये वाचवणार आहे. मात्र डीएनसी कंपनीला बाजूला ठेवत लक्ष्मी कंपनीला कामाचे टेंडर देण्याचा मोठा घाट घातला जात आहे. मुंबईतील एका पक्षाच्या मोठ्या नेत्याला धरून हे टेंडर लक्ष्मी कंपनीला देण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी चर्चा महापालिकेत गेल्या दोन दिवसांपासून सुरू आहे. दरम्यान, याबाबत स्मार्टसिटीच्या प्रमुखाशी संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही, त्यामुळे त्यांची बाजू समजू शकली नाही.



### ▪ वेळप्रसंगी आंदोलन करणार : नागटिळक

डीएनसी कंपनी दुहेरी जलवाहिनीच्या कामात १०० कोटी रुपये वाचवणार आहे. या वाचलेल्या पैशातून शहरातील रस्त्याची सुधारणा होणार आहे. माजी खा. किरीट सोमय्या यांनीही आपल्याकडून याची माहिती घेऊन लक्ष घालण्याचे आश्वासन दिले आहे. लक्ष्मी कंपनीला टेंडर देऊ नये हीच आमची मागणी आहे. त्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. वेळप्रसंगी भीमसैनिक सामाजिक संघटनेतर्फे आंदोलनही करण्यात येईल, असे नागटिळक यांनी सांगितले.